**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर**
नविन प्रशासकिय इमारत संकुल, प्लॉट नं. १, सेक्टर – १५
मोरेकुरण रोड, कोळगाव, नवनगर, ता. जि. पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र.९८ दिनांक २९/०९/२०२५

# पालघर पोलीस दलास पुरामध्ये अडकलेल्या एकूण ६६ महिला व लहान मुले यांना सुखरूपपणे बाहेर काढण्यात यश.

## डहाणु पोलीस ठाणे व वानगाव पोलीस ठाणे यांची उल्लेखनीय कामगिरी

दिनांक २६/०९/२०२५ ते दिनांक २९/०९/२०२५ रोजी पर्यंत भारतीय हवामान खात्याने पालघर जिल्ह्याला अतिवृष्टीचा (रेड अलर्ट) इशारा दिला होता. त्याअनुषंगाने श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आपआपले पोलीस ठाणे हद्दिमध्ये सतर्क राहुन संभाव्य पाणी भरण्याची ठिकाणे, पुर परिस्थीती निर्माण होण्याची ठिकाणे व सखलभाग इत्यादी परिसरात योग्य त्या उपाययोजना करण्याच्या सुचना दिल्या होत्या.

दिनांक २८/०९/२०२५ रोजी रात्रौ ०८.०० वाजताचे सुमारास डहाणु पोलीस ठाणे यांचे डायल-११२ वर कॉल आला की, चरी-आशागड रोडवर धोडीपाडा ब्रिजवर एक टेम्पो ट्रॅव्हलर गाडी पाण्यात बंद पडली आहे. बसमध्ये एकुण १६ महिला असुन तात्काळ मदत हवी असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे डहाणु पोलीस ठाण्यात डायल-११२ कर्तव्यावर असलेले पोहवा/८६२ काशिराम उंबरसाडा, पोना/९७१, गणेश गावीत यांनी तात्काळ तेथे पोहचुन परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सदरची बाब तात्काळ श्री. किरण पवार, पोलीस निरीक्षक, डहाणू पोलीस ठाणे यांना कळवुन मदतीसाठी अतिरीक्त पोलीस स्टाफ मागवुन घेतला. सदर ठिकाणी श्रीमती अंकिता कणसे, उप विभागीय पोलीस अधिकारी, डहाणू विभाग, पोनि/किरण पवार, डहाणू पोलीस ठाणे, सपोनि/तुषार पाचपुते, वानगाव पोलीस ठाणे तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार, आरसीपी पथकाचे अंमलदार असे घटनास्थळी पोहोचले. सदर ठिकाणी बस क्रमांक DD03/Q/9303 मध्ये अडकलेल्या सर्व १६ महिलांना व बस ड्रायव्हरला दोरीच्या सहाय्याने अग्नीशामक दल, आशागड ग्राम पंचायतीचे ग्राम महसुल अधिकारी व कर्मचारी यांच्या मदतीने पाण्यामधुन सुखरुप बाहेर काढले त्यामुळे पुढील संभाव्य मोठा अनर्थ टाळण्यात आला. नमूद महिला या देवदर्शनासाठी वाणगांव बाजुकडुन संतोषी मंदीर आशागड व तेथुन पुढे महालक्ष्मी देवीचे दर्शनासाठी जात असल्याचे समजले. श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी करुन महिलांकडे विचारपुस करून सर्व महिलांना जेवण देऊन त्यांना शासकिय विश्राम गृह, डहाणू येथे सुरक्षीत रित्या पोहचविण्यात आले.

त्याचप्रमाणे सपोनि/तुषार पाचपुते, वानगाव पोलीस ठाणे यांना स्थानिक नागरीकांकडून माहिती मिळाली की, वानगाव-चारोटी मुख्य रस्त्यावर मौजे पिंपळशेत येथे पाण्यामध्ये MH48-DC-8759 क्रमांकाची खाजगी बस बंद पडली आहे. सदर माहिती मिळताच पोलीस स्टापसह सपोनि/तुषार पाचपुते हे सदर ठिकाणी तात्काळ पोहोचून पाण्यामध्ये बंद पडलेल्या नमूद बसमधील एकूण ५० महिला व लहान मुले यांना सुरक्षितरीत्या बाहेर काढून दुसऱ्या वाहनाने वानगाव येथे त्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आली. सदर बस ही वसईहून बोईसर मार्गे महालक्ष्मीच्या दर्शनासाठी निघाली असल्याचे समजले.

सदरची कामगिरी ही श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विकास नाईक, उपविभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग, श्रीमती अंकिता कणसे, उप विभागीय पोलीस अधिकारी, डहाणू विभाग यांचे मार्गदर्शनाखाली डहाणू व वाणगांव पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार तसेच आरसीपी पथकाचे अंमलदार यांनी पार पाडली आहे.